**पाहिजेत**

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**शैक्षणिक**

शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनेंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश
ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय

पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा
मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २९४ वा | मंगळवार, दि. ०७ जुलै २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ऑनलाइन परीक्षा ही भ्रष्टाचार आणि घोटाळे करण्यासाठीच...

## स्पर्धा परीक्षार्थींचा भव्य मोर्चा! रोहीत पवार, अभिजीत दिपके यांची उपस्थिती

**छ.संभाजीनगर (कटूसत्य वृत्त):-** 'एमपीएससी परीक्षा ऑफलाइनच हवी' या मुद्द्यावर शहरात युवाशक्ती एकवटलेली दिसली. 'एमपीएससी'सह पोलिस भरती, लघुलेखक आणि शिक्षक पात्रता परीक्षेची (टीईटी) तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांनी दिल्ली गेट ते विभागीय आयुक्त कार्यालय परिसर दणाणून सोडला.

हे आंदोलन विभागीय आयुक्त कार्यालयासमोर करण्यात आले. आंदोलनासाठी सकाळपासून शहरातील विविध भागांतून विद्यार्थी दिल्ली गेटजवळ जमा होत होते. स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी व गैरप्रकार थांबवा, एमपीएससी परीक्षा ऑफलाइनच घ्या आणि पोलिस भरती प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करा, अशा विविध घोषणांनी विद्यार्थ्यांनी परिसर दणाणून सोडला. या आंदोलनाला आमदार रोहित पवार, क्रॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजित दिपके, विठ्ठल कांगणे, रविकांत तुपकर, नितेश कराळे, अमोल देशमुख,





बाळासाहेब शिंदे, रविराज साबळे, दीपक केदार, अमोल गाडेकर, शिवराज मोरे, सागर साळुंके आणि अभिषेक शिंदे पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी बोलताना आमदार रोहित पवार म्हणाले, अन्य राज्यात आयोगामार्फत होणाऱ्या भरती परीक्षा ऑनलाईन होतात, असे राज्य सरकारचे म्हणणे आहे. प्रत्यक्षात असे होत नाही. मात्र, सरकार खोटे बोलत आहे. राजकीय पातळीवर फोडाफोडी करुन सत्तेवर असलेल्या सरकारला विद्यार्थ्यांचे प्रश्न समजून घ्यायचे नाहीत. आम्ही मात्र यात सकारात्मक आहोत. शासकीय पातळीर राजकीय नेते जसे हा शब्द वापरतात तसा याचा अर्थ नाही, असे म्हणत गेल्या काही दिवसात झालेल्या पेपरफुटीचे उदाहरणे समोर ठेवली. तलाठी भरतीचा पेपर फुटला यात अभ्यास न करणारा मुलगा ' नॉर्मलायझेशन ' च्या निकषामुळे पुढे जात आहे. खरे तर अशा व्यवस्थेमुळे होणाऱ्या भरतीमध्ये भ्रष्टाचार करण्यास वाव निर्माण होतो असा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला.

आयोगाकडून होणाऱ्या परीक्षांसाठी पुरेशा प्रमाणात संगणक नाहीत. एकाच पदासाठी अनेक वेळा परीक्षा होत असल्याने निकष ठरविणे अवघड होऊन गेले आहे. जर दहावी, बारावी, युपीएससीच्या परीक्षा नीट होतात तर मग महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा ऑनलाईन का, असा प्रश्न त्यांनी विचारला. या प्रश्नावर सरकारपर्यंत आवाज पोहचावा म्हणून पुणे येथे पुन्हा आंदोलन करण्याचा निर्णयही घेण्यात आला. या आंदोलनात काही विद्यार्थ्यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. लाकुडतोड्याच्या गोष्टीतील 'सोन्याची कुऱ्हाड आम्हाला नको, आम्हाला आमची लोखंडी कुऱ्हाडच द्या ' या शब्दात ' ऑफलाईन ' परीक्षेची मागणी करण्यात आली. या आंदोलनात रविराज साबळे, आशिष मगर, रविकांत तुपकर, बाबासाहेब शिंदे, शिवराज मोरे, प्रमोद पाटील, किरण निंभोरे यांचा सहभाग होता.

**' आम्ही व्हायरस नाही, व्हॅक्सीन '**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी जंतरमंतरवर आंदोलन करणाऱ्यांना आंतकवादी म्हटले. पण देशातील तरुणाई ही ' व्हायरस ' नाही ' व्हॅक्सीन ' आहे. उलट तुमच्यामुळे देशातील नीटची तयारी करणाऱ्या २० जणांनी आत्महत्या केल्या. पेपरफुटीमुळे अनेकांचे आयुष्य पणाला लागले. या स्थितीला तुम्हीच जबाबदार असल्याने तुम्हीच आंतकवादी आहात, असे कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजीत दिपके या वेळी म्हणाले. दिल्लीतील जंतरमंतरवर सुरू असणाऱ्या आंदोलनात सोनम वांगचूक हे गेल्या १६ दिवसापासून उपोषण करत आहेत. दिल्लीतील आंदोलन धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतल्याशिवाय थांबणार नाही. या आंदोलनात मराठवाड्यातील तरुणांनी सहभाग द्यावा, असे आवाहन दिपके यांनी केले.

दिल्ली गेट ते विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली होती. 'हक्क आमचा, लढा भविष्याचा' अशा घोषणा देत आणि विविध मागण्यांचे फलक हाती घेत विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. आमदार पवार, कांगणे, दिपके, कराळे यांच्यासह समितीच्या इतर पदाधिकाऱ्यांच्या भाषणांना उपस्थित तरुणांनी टाळ्या वाजवून दाद दिली. या आंदोलनात एमपीएससीसह पोलिस भरती, टीईटी आणि लघुलेखक पदांची तयारी करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**अशा आहेत प्रमुख मागण्या:**

- स्पर्धा परीक्षांची विश्वासार्हता टिकवण्यासाठी 'एमपीएससी' आणि 'टीईटी'सारख्या महत्त्वाच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीनेच घेण्यात याव्यात.
- पेपरफुटीसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. यासाठी जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद असलेला कायदा तातडीने लागू करावा.
- भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी एक सक्षम व त्रयस्थ यंत्रणा कार्यान्वित करावी.
- पोलिस भरतीचे वेळापत्रक तातडीने जाहीर करावे.
- टीईटी परीक्षेची तारीख तातडीने घोषित करावी.
- लघुलेखक पदे पुनरुज्जीवित करून त्यावरील भरती प्रक्रिया सुरू करावी.
- 'गट ड' मधील पदभरतीचे केंद्रीकरण रद्द करून भरती प्रक्रिया कायमस्वरूपी व नियमितपणे राबवावी.

**परिसराला पोलिस छावणीचे स्वरूप**

विद्यार्थ्यांच्या या भव्य आंदोलनामुळे विभागीय आयुक्त कार्यालय आणि सुभेदारी विश्रामगृह परिसराला पोलिस छावणीचे स्वरूप आले होते. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरक्षेचा उपाय म्हणून शहरातील पोलिस उपायुक्त, सहाय्यक पोलिस आयुक्तांसह वरिष्ठ पोलिस निरीक्षक, पोलिस निरीक्षक आणि दीड हजारांहून अधिक पोलिसांचा फौजफाटा बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आला होता.

## स्टोरी 'शिवराज्याभिषेक सोहळ्याची...' : 'The Kiran Mane Show' ला सोलापुरात हाऊसफुल्ल प्रतिसाद

### हुतात्मा स्मृती मंदिरच्या इतिहासात प्रथमच नाटकाचा प्रयोग हाऊसफुल्ल; १५ ऑगस्टला दोन अतिरिक्त प्रयोगांची घोषणा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आधारित 'स्टोरी शिवराज्याभिषेक सोहळ्याची... The Kiran Mane Show' या नाटकाला सोलापूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शहरातील हुतात्मा स्मृती मंदिर येथे रंगलेल्या या प्रयोगाला प्रेक्षकांची इतकी मोठी गर्दी झाली की संपूर्ण सभागृह हाऊसफुल्ल झाले. विशेष म्हणजे, हुतात्मा स्मृती मंदिरच्या स्थापनेपासून एखाद्या नाटकाचा प्रयोग पूर्ण क्षमतेने हाऊसफुल्ल झाल्याची ही पहिलीच घटना असल्याचे प्रेक्षकांनी सांगितले.

नाटकाच्या प्रयोगादरम्यान प्रेक्षकांनी विविध प्रसंगांना टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकामागील






ऐतिहासिक घटनाक्रम, त्यामागील संघर्ष, त्यावेळीच्या ब्राह्मणवादी ब्राह्मणांनी कश्या पद्धतीने त्रास दिला होता तेही या नाटकातून दाखवले, स्वराज्याची संकल्पना आणि इतिहासातील अनेक पैलू प्रभावी शैलीत मांडण्यात आल्याने प्रेक्षक भारावून गेले.


प्रयोगानंतर अभिनेते किरण माने यांनी प्रेक्षकांशी संवाद साधत सोलापूरकरांनी दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रेक्षकांचा वाढता उत्साह लक्षात घेता, १५ ऑगस्ट रोजी सोलापूरमध्ये या नाटकाचे दोन विशेष प्रयोग आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. या घोषणेनंतर उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

नाटक पाहून बाहेर पडणाऱ्या अनेक प्रेक्षकांनी "आजपर्यंत ऐकलेल्या इतिहासापेक्षा वेगळे आणि अभ्यासपूर्ण संदर्भ या नाटकातून समजले", अशा भावना व्यक्त केल्या. इतिहासातील घटनांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी या नाटकाने दिल्याचे मत अनेकांनी नोंदविले.

ऐतिहासिक विषय, प्रभावी मांडणी, दमदार अभिनय आणि अभ्यासपूर्ण सादरीकरण यामुळे 'स्टोरी शिवराज्याभिषेक सोहळ्याची... The Kiran Mane Show' हे नाटक सोलापूरकरांच्या पसंतीस उतरले असून, १५ ऑगस्टच्या दोन प्रयोगांनाही मोठी गर्दी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## सोलापूर जिल्हा परिषदेतर्फे 50 हजार वारकऱ्यांना नि:शुल्क रेनकोट वितरण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारी 2026 च्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा परिषदेकडून वारकऱ्यांसाठी व्यापक आणि सुसूत्र नियोजन करण्यात आले आहे. यंदा सुमारे 50 हजार वारकऱ्यांना मोफत रेनकोटचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.



आषाढी वारी नियोजनाबाबत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना जैन यांनी सांगितले की, राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा विचार करून वारकऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात आले आहे. पावसापासून संरक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर रेनकोटचे वितरण करण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

वारकरी मार्गावरील स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरोग्य सुविधा, स्वच्छतागृहे, औषधोपचार व्यवस्था, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, पथदिवे तसेच रस्त्यांची दुरुस्ती यांसह मूलभूत सुविधांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वारी मार्गावरील ग्रामपंचायती, आरोग्य विभाग, पाणीपुरवठा विभाग, शिक्षण विभाग आणि इतर संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून सर्व विभागांमध्ये समन्वय साधून काम सुरू आहे.

"वारकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जात आहे. आषाढी वारी सुरक्षित, सुरळीत आणि सुविधायुक्त वातावरणात पार पडावी यासाठी जिल्हा परिषद प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे," असा विश्वास कुशल जैन यांनी व्यक्त केला.

या नियोजनामुळे यंदाची आषाढी वारी अधिक सुव्यवस्थित आणि सुरक्षित होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


## सोलापूर जिल्ह्यात पावसाची संथ सुरुवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात चालू मॉन्सून हंगामात पावसाची सुरुवात अत्यंत संथ गतीने झाली असून, जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यांमध्ये अद्याप मोठ्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे. जिल्ह्यातील काही मोजकी मंडळे वगळता इतर ठिकाणी पावसाचा जोर कमी असून, एकूण सरासरीच्या तुलनेत अत्यंत कमी पावसाची नोंद झाली आहे.

रविवारी (ता. 5) दिवसभर कधी ऊन, कधी ढगाळ तर कधी काही भागात हलक्या पावसाच्या सरी असे चित्र होते

जिल्हा प्रशासनाच्या अहवालानुसार, बार्शी आणि करमाळा तालुक्यातील काही महसूल मंडळांमध्ये हलका ते मध्यम पाऊस झाला आहे. बार्शी तालुक्यातील वैराग आणि उपाळे दुमाले या मंडलांमध्ये इतर भागांच्या तुलनेत थोडा चांगला पाऊस झाला आहे. उपाळे दुमाले येथे सर्वाधिक २६.१ मिमी पावसाची नोंद झाली असून, वैरागमध्ये १५.६ मिमी पाऊस पडला आहे. करमाळा तालुक्यातील अंजनगाव मंडळात २३.४ मिमी, तर जेऊर मंडलात २२.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यामुळे या भागातील शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

दुसरीकडे, सांगोला आणि माळशिरस या दुष्काळी पट्ट्यात पावसाने पुन्हा एकदा ओढ दिली आहे. सांगोला



तालुक्यातील सावे (७.० मिमी), जवळा (३.६ मिमी) आणि हटकर मंगेवाडी (१०.१ मिमी) या मंडलांमध्ये अतिशय कमी पाऊस झाला असून, सरासरीच्या तुलनेत ही टक्केवारी चिंताजनक आहे. माळशिरस तालुक्यातील अनेक मंडलांमध्ये तर पावसाची केवळ हजेरीच पाहायला मिळाली आहे.

दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मंगळवेढा आणि अक्कलकोट तालुक्यातील अनेक मंडलांमध्ये पावसाची नोंद शून्य (0.0 मिमी) किंवा १ ते २ मिमी इतकीच अत्यंत नगण्य आहे. अक्कलकोट तालुक्यातील तडवळ, वागदरी आणि चपळगाव मंडलांमध्ये अद्याप खातेही उघडलेले नाही.

**खरीप पेरण्या खोळंबल्या**

जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी पावसाचे दिवस केवळ १ ते २ दिवस किंवा शून्य दाखवत असल्याने जमिनीमध्ये अजून पुरेशी ओल निर्माण झालेली नाही. त्यामुळे मोठ्या पावसाअभावी जिल्ह्यातील खरिपाच्या पेरण्या लांबणीवर पडल्या आहेत.

## सावधान ! बोगस पीक विमा उतरवाल तर कारवाई नक्की

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाने चालू आर्थिक वषार्साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना जाहीर केली आहे. जिल्ह्यात यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकरी अजूनही पेरणीच्या प्रतीक्षेतच आहेत. त्यामुळे विमा कशाचा उतरवायचा, असा प्रश्न जिल्ह्यात आहे.

दरम्यान प्रत्यक्षातील पिकांव्यतिरिक्त बोगस पीक विमा उतरविल्यास कारवाई केली जाणार आहे. डीबीटीद्वारे 'नमो महासन्मान'सारखी योजना बंद करुन त्या शेतकर्यास ब्लॅक लिस्टमध्ये टाकले जाणार आहे.

यंदा भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस व खरीप कांदा या १४ पिकांसाठी खरीप हंगामातील विमा योजना आहे. शेतकऱ्यांना विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के विमा हप्त भरून सहभाग घ्यावा लागेल.

कापूस व कांदा या नगदी पिकांसाठी हा विमा हप्ता विमा




संरक्षित रकमेच्या ५ टक्के राहील. या शासन निर्णयामुळे अधिसूचित महसूल मंडळात चालू वषीर्चे सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत कमी आल्यास विमा नुकसान भरपाई लागू होणार आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पीक विमा पोर्टल आणि बँक, सामूहिक सुविधा केंद्र किंवा स्वतः शेतकरी ऑनलाइन अर्ज भरून भाग घेऊ शकतात.

**या १४ पिकांसाठी विमा**

भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस व खरीप कांदा या १४ पिकांसाठी विमा असून त्याचा शेतकऱ्यांना ३१ जुलैपर्यंत या योजनेत सहभागी होणार आहे.

**आधार क्रमांक खात्यास जोडावा**

ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक (फार्मर आयडी) बंधनकारक आहे, जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक, आधार संलग्न पेमेंटसाठी आधार क्रमांक बँक खात्यास जोडलेला असावा.

## एकाच पावसात महाराष्ट्र ठप्प !

### 'इमर्जन्सी' जाहीर करा- खा. सुळे

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** राज्यात कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागात भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्याचे अधिवेशन सुरू असताना पुणे-मुंबई दरम्यानची वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. या गंभीर परिस्थितीवरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारवर अत्यंत आक्रमक शब्दांत निशाणा साधला आहे.

'एवढे मोठे प्रकल्प करताना सरकारने पर्यावरणाचा अजिबात विचार केलेला नाही. परिणामी, अवघ्या एका पावसात संपूर्ण महाराष्ट्र पॅरलाइझ (ठप्प) झाला आहे,' अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी सत्ताधाऱ्यांचा समाचार घेतला. 'सत्तेतील लोक नेहमी ७० वर्षांचा हिशोब मागतात, पण गेल्या १२ वर्षांपासून सत्तेत बसलेल्या या लोकांच्या कामाचा हिशोब कोण देणार?' असा प्रश्न उपस्थित करत सुळे यांनी गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्तेत असलेल्या भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांना चांगलेच धारेवर धरले. राज्याचे अधिवेशन सुरू असताना अशी स्थिती निर्माण होणे हे सरकारचे अपयश असल्याचे त्या म्हणाल्या.

खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी सकाळी महापालिकेत भेट दिली. त्यावेळी त्यांनी महापालिकेच्या वतीने सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. या बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना



त्यांनी पावसामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीवर भाष्य केले. त्या म्हणाल्या, पुणे-मुंबई दरम्यानची कनेक्टिव्हिटी पूर्णपणे ठप्प होणे ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. हे सरकार स्वतःला 'इन्फ्रास्ट्रक्चरचे सरकार' म्हणवून घेते, पण जर त्यात जनतेची सुरक्षाच नसेल आणि पर्यावरणाचा कोणताही विचार नसेल, तर अशा कामांचा काय उपयोग?' असा संतप्त सवाल सुळे यांनी केला. सध्याच्या सद्यस्थितीत नागरिकांना प्रवास टाळण्याचे आवाहन त्यांनी केले असून मुख्यमंत्र्यांनी राज्यात तातडीने 'एमर्जन्सी' घोषित करावी, अशी मागणी केली.

**तुमच्या १२ वर्षांचा हिशोब कोण देणार?**

विरोधी पक्षांवर नेहमी ७० वर्षांच्या कार्यकाळावरून टीका करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना सुप्रिया सुळे यांनी उत्तर दिले. त्या म्हणाल्या, 'गल्लीपासून दिल्लीपर्यंत आज यांचेच सरकार आहे. सत्ताधारी नेहमी ७० वर्षांचा हिशोब मागतात, पण आज महाराष्ट्राची जी दुर्दशा झाली आहे, त्यावरून यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळाचा हिशोब कोण देणार? सत्तेतील लोकांना केवळ पक्ष फोडण्यात आणि घरे फोडण्यात रस आहे. हे पाप करण्यासाठी सरकारकडे वेळ आहे, मात्र जनतेच्या सुरक्षेचे नियोजन करण्यासाठी यांच्याकडे वेळ नाही,' असा टोला त्यांनी लगावला. पुण्यात पडणारी झाडे आणि विस्कळीत झालेले जनजीवन पाहता, सरकारचे नियोजन केवळ 'इन्फ्रा' आणि 'कंत्राटदारां'साठीच आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**'मिसिंग लिंक'च्या कामाची चौकशी करा**

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पाबाबत बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, 'सुरुवातीला वेळ वाचणार म्हणून आम्हीही या 'मिसिंग लिंक'चे कौतुक केले. पण आता तिथले जे व्हिडिओ समोर येत आहेत, ते पाहून सुरुवातीला मला वाटले की हे व्हिडिओ कृत्रिम बुद्धिमत्ताद्वारे (एआय) बनवले आहेत की काय? पण प्रत्यक्षात तिथे अतिशय चिंताजनक परिस्थिती आहे. एवढा निधी खर्च करूनही कामात स्पष्ट 'मिसमॅच' दिसत आहे. यात मी थेट घोटाळा झाला असे म्हणणार नाही, पण या कामावर किती पैसे खर्च झाले आणि याचे ऑडिट झाले का? या सगळ्याची उत्तरे सरकारला द्यावीच लागतील. या कामाची पारदर्शक चौकशी झालीच पाहिजे.' अशी मागणी त्यांनी केली.

## संपादकीय

# भाजपचे राजकारणापलीकडचे सत्ताकारण

भारतीय राजकारणात "राजकारण" आणि "सत्ताकारण" या दोन संकल्पनांमधील फरक गेल्या दशकात अधिक ठळकपणे दिसून येत आहे. मतदारांपर्यंत विचार पोहोचवणे, जनतेचे प्रश्न मांडणे आणि निवडणुका जिंकणे हे राजकारणाचे पारंपरिक स्वरूप मानले जात होते. मात्र सत्ता मिळाल्यानंतर ती दीर्घकाळ टिकवण्यासाठी आखली जाणारी रणनीती म्हणजे सत्ताकारण. आजच्या राजकीय घडामोडींकडे पाहिले तर हा फरक अधिक स्पष्ट होताना दिसतो.

महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांमध्ये घडलेल्या राजकीय घटनांनी एक बाब अधोरेखित केली आहे की, केवळ निवडणूक जिंकणे हे अंतिम ध्येय राहिलेले नाही. विरोधी पक्षांतील प्रभावी, जनाधार असलेले आणि भविष्यात नेतृत्व करू शकणारे नेते आपल्या गोटात आणणे किंवा मित्रपक्षांकडे वळवणे, ही रणनीती अधिक प्रभावीपणे वापरली जात आहे. या प्रक्रियेमुळे विरोधी पक्षांची संघटनात्मक ताकद कमी होते, नेतृत्वाची दुसरी फळी कमकुवत होते आणि भविष्यात ते पक्ष सक्षम पर्याय म्हणून उभे राहण्याची शक्यता घटते, असा आरोप विरोधक सातत्याने करत आले आहेत.

महाराष्ट्रातील गेल्या काही वर्षांतील राजकीय उलथापालथ याचे प्रमुख उदाहरण मानले जाते. राज्यातील प्रमुख प्रादेशिक पक्षांतील मोठे नेते सत्ताधारी आघाडीकडे वळल्याने केवळ सरकारे बदलली नाहीत, तर विरोधी पक्षांच्या संघटनात्मक रचनेवरही परिणाम झाला. यामुळे राज्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत.

विशेष म्हणजे, भारतीय जनता पक्षाला अनेक राज्यांत स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतरही विरोधी पक्षांतील नेत्यांना आपल्या गोटात सामावून घेण्याचे प्रयत्न सुरूच राहिले. यामागे केवळ संख्याबळ वाढविणे हा उद्देश नसून, भविष्यातील संभाव्य राजकीय आव्हाने आधीच निष्प्रभ करण्याची रणनीती असल्याचे अनेक राजकीय विश्लेषकांचे मत आहे. सत्ता टिकवण्यासाठी केवळ निवडणूक जिंकणे पुरेसे नसते; प्रतिस्पध्यार्ची ताकद कमी करणेही तितकेच महत्त्वाचे मानले जात असल्याचे या घडामोडींमधून दिसते.

दुसरीकडे, काँग्रेस आणि तिच्या सहयोगी पक्षांनी अनेक वर्षे केंद्र व राज्यांमध्ये सत्ता उपभोगली. मात्र त्या काळात विरोधी पक्षांतील प्रभावी नेतृत्व आपल्या गोटात आणून त्यांच्या राजकीय अस्तित्वालाच मोठा धक्का देण्याची रणनीती त्यांनी फारशी अवलंबल्याचे दिसत नाही. सत्तेचा उपभोग आणि सत्तेचे दीर्घकालीन व्यवस्थापन यात फरक असतो, याची जाणीव त्यांना उशिरा झाली, अशी टीका त्यांच्या विरोधकांकडून केली जाते.

आज अनेक राज्यांमध्ये सत्ताविरोधी वातावरण, महागाई, बेरोजगारी किंवा स्थानिक नाराजी असूनही भाजप सत्तेत कायम राहतो किंवा पुन्हा सत्तेवर येतो, यामागे केवळ निवडणूक प्रचार किंवा संघटनशक्तीच कारणीभूत नाही. तर दीर्घकालीन सत्ताकारण, विरोधी पक्षांचे विघटन, प्रभावी नेतृत्वाला आपल्या बाजूने वळविण्याची रणनीती आणि राजकीय समीकरणांवर सातत्याने नियंत्रण ठेवण्याची क्षमता हेही महत्त्वाचे घटक मानले जातात.

लोकशाहीत पक्षांतर, आघाड्या आणि राजकीय पुनर्रचना या घटना नवीन नाहीत. मात्र त्याचे प्रमाण वाढल्यास मतदारांच्या कौलाचा अर्थ, विरोधी पक्षांचे अस्तित्व आणि लोकशाहीतील सक्षम पर्याय या बाबींवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. मजबूत लोकशाहीसाठी सत्ताधारी पक्ष जितका सक्षम असणे आवश्यक आहे, तितकाच सक्षम आणि प्रभावी विरोधी पक्षही आवश्यक असतो.

आज भारतीय राजकारण एका नव्या टप्प्यावर उभे आहे. येथे विचारसरणी, पक्षनिष्ठा आणि निवडणूक जिंकण्यापेक्षा सत्ता टिकविण्याची कला अधिक महत्त्वाची ठरत आहे. त्यामुळे "राजकारण" आणि "सत्ताकारण" यांच्यातील सीमारेषा अधिक स्पष्ट झाली आहे. आगामी काळात ही रणनीती भारतीय लोकशाहीला अधिक मजबूत करेल की विरोधी पक्षांच्या अस्तित्वावर परिणाम करेल, याचे उत्तर मात्र काळच देईल.

# अंधश्रद्धेला मशाल दाखवत तरुणांनी भीतीची केली होळी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** समाजात विज्ञाननिष्ठ विचारांचा प्रसार होत असला तरी अंधश्रद्धेच्या घटनाही अधूनमधून समोर येत आहेत. माशाळ नगर येथे रविवारी सकाळी रस्त्याच्या कडेला बाहुली, टाचण्या, लिंबू आणि धारदार वस्तूंचा समावेश असलेले संशयास्पद साहित्य आढळल्यानंतर स्थानिक तरुणांनी कोणतीही भीती न बाळगता ते हटवून भररस्त्यात त्याची होळी केली. या कृतीतून त्यांनी अंधश्रद्धेला ठाम विरोध करत वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संदेश दिला.

माशाळ नगरात यापूर्वीही अशाच प्रकारची घटना घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, हेमंत पवार, ॲड. अभिजित पाटील, प्रशांत बुरुडकर, मंगेश पवार, महादेव काटकर, बाळ बुरूडकर, सचिन गुत्तेदार, शिवा ईश्वरकट्टी आणि राहुल लाड** या तरुणांनी पुढाकार घेत संशयास्पद साहित्य गोळा केले. त्यानंतर सर्वांच्या उपस्थितीत त्याची विल्हेवाट लावत अंधश्रद्धेच्या भीतीवर प्रहार केला.



स्थानिक तरुण राहुल लाड यांनी सांगितले की, "अंधश्रद्धेवर विश्वास ठेवण्यापेक्षा अशा प्रकारांकडे वैज्ञानिक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. भीती न बाळगता समाजात विवेकाचा संदेश पोहोचवणे ही काळाची गरज आहे."

**अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे स्वागत**

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील कार्यकर्त्यांनी या कृतीचे स्वागत करत, अशा प्रकारच्या वस्तूंमुळे कोणतेही अहित होत नसल्याचे पुन्हा अधोरेखित केले. भीती ही मानवी मनाची निर्मिती असून, तरुणांच्या या कृतीमुळे समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन बळकट होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त करण्यात आले.

**नागरिकांच्या सुरक्षेसाठीही महत्त्वाची कृती**

हा प्रकार केवळ अंधश्रद्धेपुरता मर्यादित नव्हता. रस्त्यावर टाकण्यात आलेल्या मोठ्या टाचण्या आणि धारदार वस्तूंमुळे रात्रीच्या वेळी ये-जा करणाऱ्या नागरिकांना, लहान मुलांना तसेच मुक्या प्राण्यांना गंभीर दुखापत होण्याची शक्यता होती. संभाव्य अपघात टाळण्यासाठी तरुणांनी तातडीने हे साहित्य हटवून परिसर स्वच्छ केला. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही ही कृती महत्त्वाची ठरली.

## वात्रटिका

### लग्नातही तो आमिर

लग्न होत नाही म्हणून
कोणी तिळ तिळ तुटतो...
एकसष्टी मध्येही कोणी
लग्नाचा आनंद लुटतो...
नावाप्रमाणे आमिर आहे तो
तिसऱ्यांदा बोहल्यावर चढला...
तो सुखी म्हणून नव्हे,पण आम्ही
कमनशिबी म्हणून तो रडला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# रामराज्यात चौकीदार चोर!

**अयोध्येतील रामजन्मभूमी मंदिर आणि घोटाळ्यांची मालिका खूप मोठी आहे. जिथे बाबरी मशीद होती; तिथे आताचे मंदिर उभे नाही; हाच मोठा घोटाळा आहे.**

*राम नाम की लूट है,*
*लूट सके तो लूट।*
*अंतकाल पछताएगा,*
*जब प्राण जाएगे छूट॥*

संत कबिरांचा हा 'दोहा' अयोध्येतल्या "रामजन्मभूमी मंदिर"च्या कारभाऱ्यांनी शब्दशः आचरणात आणला आणि भाविकांच्या दान- देणग्यांवर ७ कोटी रुपयांचा डल्ला मारल्याचे प्रथमदर्शनी उघडकीस आले. (हा आकडा १०० पटीने वाढण्याची शक्यता सांगितली जाते. असो.) इतक्याच रकमेचे म्हणजे, साडेचार किलो सोन्याचे दागदागिने केरळातील शबरी मंदिराच्या कारभाऱ्यांनीच लंपास केल्याचे यापूर्वीच उघड झाले आहे. तिरुपतीच्या वेंकटेश्वर मंदिरातील (तामिळनाडू) "लाडू घोटाळा" २५० कोटी रुपयांचा; तर वैष्णोदेवी मंदिरातील (जम्मू-काश्मीर) "चांदी घोटाळा" ५५० कोटी रुपयांचा आहे. ह्या दोन्हीच्या तुलनेत राम मंदिर आणि शबरीमाला मंदिराचे घोटाळे किरकोळ म्हटले पाहिजे. राम मंदिर वगळता इतर तीन मंदिरे ही जागृत आणि नवसाला पावणारी देवस्थानं आहे. पण दानात आणि प्रसादात चोऱ्या होत असताना तिथले देव-देवता झोपलेले होते. अयोध्येचे राम मंदिर हे राजकीयदृष्ट्या जागृत मंदिर आहे. ते मंदिर- मशीद वादाच्या आंदोलनातून निर्माण झाले आहे.

हे आंदोलन कधीच शुद्ध धार्मिक वा आध्यात्मिक हेतूने केलेले नव्हते. ते कायम वादग्रस्त आणि घोटाळ्याचे राहिलेले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दोनच वर्षांत अध्योध्येतील बाबरी मशीदमध्ये रामलल्लाची मूर्ती घुसवून चमत्काराची अफवा पसरवण्यात आली. तेव्हापासून मंदिर-मशीद वादाचा विषय न्यायप्रविष्ट झाला. यानंतर १९८६-८८ ह्या काळात शाहबानो पोटगी प्रकरणाने मुस्लीम कट्टरता वादाचा भडका उडाला. त्याला तोडीसतोड उत्तर देण्यासाठी संघ- भाजप परिवाराने लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली "रामजन्मभूमी मुक्ती रथयात्रा" काढली. ह्याच दरम्यान, "विश्व हिंदू परिषद"तर्फे छोट्या बाटल्यांतून गंगाजल विक्रीच्या यात्रा निघाल्या. ह्या विक्रीतून जमलेल्या पैशांचा हिशेब कधीच जाहीर झाला नाही. देश- विदेशातून मंदिर निमार्णासाठी अयोध्येत जमवलेल्या विटांचे पुढे काय झालं, ते रामसेवकांनी कधी विचारलं नाही; तेच २०२२ मध्ये राम मंदिर निर्माणाच्या जमवलेल्या निधी बाबत झाले. त्याआधी मंदिर- मशीद खटल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधिशांच्या खंडपीठाने लावला. पण निकालपत्रावर तीनही न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्या नाहीत. मंदिराचे काम पूर्ण झाले नसल्यामुळे मूर्ती प्राणप्रतिष्ठा विधी, ध्वजारोहण विधी आणि उद्घाटन समारंभाला ४ पैकी एकही शंकराचार्य आले नाहीत. शेकडो कोटी रुपए खर्च केलेल्या मंदिराच्या छप्पराला पहिल्या पावसात गळती लागली.

अयोध्येतील रामजन्मभूमी मंदिर आणि घोटाळ्यांची ही मालिका खूप मोठी आहे. जिथे बाबरी मशीद होती; तिथे आताचे मंदिर उभे नाही; हाच मोठा घोटाळा आहे. तिथे जर रामजन्मभूमी मंदिर उभे करायचे नव्हते, तर बाबरी मशीद पाडण्याचे कारण काय? बाबरी मशीद पाडताना मी पाहिले आहे. तेव्हा पत्रकार म्हणून अयोध्येत हजर होतो. त्यावेळी जे वाटले- लिहिले; त्या मताशी आताही ठाम आहे. बाबरी मशीद ही परकीय आक्रमकांनी किती क्रूरपणे हिंदूंना अपमानित करून भारतावर राज्य केले, ह्याचा पुरावा होता. त्याच्या बाबरीवरच्या खुणा पाहताक्षणी संताप आणायच्या. त्या नष्ट करण्याचे नादान काम संघ- भाजप परिवाराने केले आहे. ही हरामखोरी होती. म्हणूनच २०२४ च्या लोकसभा निवडणुकीआधी अयोध्येत रामजन्मभूमी मंदिर उभारणे, ही "संघ-भाजप"साठी मजबुरी ठरली.

मंदिर उभारणी हा संघ-भाजप परिवाराचा एकच एक उद्देश असता; तर बाबरी मशिदीचे पतन होताच, मंदिर उभारणीचे काम सुरू झाले असते. तसे घडले नाही. त्याचप्रमाणे, हिंदू खरंच रामजन्मभूमी मंदिर निर्माणबाबत आग्रही असते; तर त्यांनी मंदिरासाठी जमिनी दान केल्या असत्या; त्या चढ्या भावात मंदिराच्या ट्रस्टला विकल्या नसत्या. हा जमिनींनी खरेदीचा घोटाळा मंदिरातल्या दान- दागिन्यांच्या लंपासगिरीपेक्षा कित्येक पटीने मोठा आहे. रामजन्मभूमी मंदिर निमार्णासाठी "श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट"तर्फे जमीन खरेदी करण्यात आली. त्यातही मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेत.

**नमुन्यादाखल दोन उदाहरणं -**

अ) कुसुम पाठक यांच्याकडून १८ मार्च २०२१ रोजी संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी राजू तिवारी व सुलतान अन्सारी यांनी दोन कोटी रुपयांत जमीन खरेदी केली; आणि त्याच दिवशी पाच मिनिटांनंतर; म्हणजे १८ मार्च २०२१ रोजी ७ वाजून १५ मिनिटांनी; तीच जमीन "श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट"ने अठरा कोटी रुपयांना विकत घेतली.

ब) महंत देवेंद्र प्रसाद यांनी दीपनारायण उपाध्याय यांना ८९० चौरस मीटर जमीन २० फेब्रुवारी २०२१ रोजी २० लाख रुपयांना विकली. ती जमीन दीपनारायण उपाध्याय यांनी ३ महिन्यांनी; २१ मे २०२१ रोजी "रामजन्मभूमी मंदिर ट्रस्ट"ला अडीच कोटी रुपयांना विकली. म्हणजे ३ महिन्यांत जमिनीची किंमत १२ पटीने वाढली. या सौद्यात "रामजन्मभूमी ट्रस्ट"चे सदस्य अनिल मिश्रा आणि राजकुमार दास हे साक्षीदार होते. ही दोन्ही प्रकरणं "आम आदमी पार्टी"चे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी जाहीर केली आहेत.

या जमीन घोटाळाप्रकरणी ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला असता ते म्हणाले, "शंभर वर्षांपासून आम्ही आरोपच ऐकत आहोत. आमच्यावर महात्मा गांधींच्या हत्येचाही आरोप झाला होता. आरोपाची आम्ही चिंता करत नाही. तुम्हीसुद्धा करू नका." विशेष म्हणजे, दोन्ही सौद्यांमध्ये साक्षीदार समान आहेत. मंदिर उभारणीचा पायाच इतका भ्रष्टाचाराने भुसभुशीत झाला असेल, तर दान- देणग्या सत्पात्री आणि सुरक्षित कशा राहणार? महिपाल सिंग हे "श्री रामजन्मभूमी मंदिर"चे लेखा प्रभारी म्हणजे "अकाउंट्स इन चीफ" होते. तेव्हा त्यांनी व्यवस्थापनात आणि देणग्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचे आरोप पुराव्यांसह केले होते. ते असे होते -

अ) रोख रकमेची मोजणी करताना, प्रत्यक्ष रकमेपेक्षा कमी रकमेची व्हाउचर्स बनवली जातात. या पद्धतीचा वापर करून शिल्लक रक्कम लंपास केली जाते.

ब) भाविकांनी देवा चरणी अर्पण केलेले सोने, चांदी आणि इतर मौल्यवान वस्तूंचा कोणताही अधिकृत हिशोब ठेवला जात नाही. तसेच, ह्या किमती वस्तूंची भाविकांना तपशिलासह पावती दिली जात नाही. ही प्रशासकीय उदासीनता संशयास्पद आहे.

क) भाविक मूर्ती चरणी रोख रक्कम अर्पण करतात किंवा मूर्तीला सोन्या चांदीचे दागदागिने घालतात; त्याला "चढावा" म्हणतात. त्याचे "सीसीटीव्ही"मध्ये चित्रीकरण होते. ते दान-देणग्यांच्या हिशेब तपासणीसाठी महत्त्वाचे असते. हे ठाऊक असूनही सीसीटीव्ही फुटेज मुद्दाम डिलीट (नष्ट) करण्यात येते. जेणेकरून तेथील हालचालींचा कोणताही पुरावा उरणार नाही. (उत्तर प्रदेश सरकारने चौकशीसाठी नेमलेल्या विशेष पोलिस पथकाला उपलब्ध "सीसीटीव्ही फुटेज"मधून ७० चोऱ्या सापडल्यात.) ही आर्थिक गैरव्यवहाराची आणि भ्रष्टाचाराची सविस्तर माहिती महिपाल सिंग यांनी "श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट"चे सरचिटणीस चंपत राय बन्सल यांना दिली होती. मात्र, त्यांनी दोषींवर कडक कारवाई करण्याऐवजी महिपाल सिंग यांनाच त्यांच्या पदावरून हटवलं.

अयोध्येतील राम मंदिरातील सेवेकऱ्यांनी दान- देणग्यांवर मारलेला करोडोंच्या डल्ला जाहीर होताच, "शिवसेना" नेते व राज्यसभा खासदार यांनी "उद्धव ठाकरे यांनी राम मंदिराला दिलेली ४ किलोची चांदीची वीट आणि १ कोटी रुपये कुठे आहेत," असा प्रश्न विचारलाय. ह्या दान- देणगीची पावती अद्याप मिळाली नाही, अशीही त्यांची तक्रार आहे. ह्या दोन्ही बाबी त्यांच्या तल्लख बुद्धीला साजेशा नाहीत. दुष्काळ पडला. प्रजा भुकेने कासावीस झाली. म्हणून दामाजीपंताने विठ्ठलाचे नाव घेत धान्याची सरकारी कोठारं लोकांसाठी खुली केली. त्याने चवताळलेल्या आदिलशहाने "धान्याचे पैसे दे, नाहीतर फाशीच्या शिक्षेला तयार राहा," असं फर्मान दामाजीपंताच्या विरोधात काढलं. दामाजी प्रामाणिक नोकर असल्याने कफल्लक होता. त्याने "विठ्ठलाचा धावा" सुरू केला. आणि भर दरबारात विठुराया "विठू महार"च्या रूपात हजर झाला. त्याने दामाजीच्या माथ्यावर आदिलशहाने ठेवलेले कर्ज फेडले आणि दामाजीचे प्राण वाचवले. अशी आख्यायिका आहे. हा प्रसंग "झाला महार पंढरीनाथ" ह्या चित्रपटात आहे. त्यावर चित्रित केलेल्या गाण्यामध्ये ग. दि. माडगूळकर लिहितात -

खळखळा ओतल्या मोहरा
त्याची पावती करुनी द्या -

सारांश, पावती जेव्हाच्या तेव्हा मागायची; घ्यायची असते. मुद्देमाल गुल झाल्यावर पावती काय मागतात? आणि आता ती मिळाली; तर ती दाखवून दिलेलं दान- देणगी परत मागणार का? मुळात, उद्धव ठाकरे यांनी दान- दक्षिणा देण्यापूर्वी आपल्या आजोबांनी ; "प्रबोधन"कार ठाकरे यांनी लिहिलेली "देवळांचा धर्म, धमार्ची देवळे" हे छोटी पुस्तिका नजरेखालून घातली असती, तर आज उलटी-पालटी कसरत करावी लागली नसती.

*देव- देवळे भटी सापळे*
*घातक झाले देशा -*
*मोडा तोडा, उलथुनि पाडा*
*उखडा त्याच्या पाशा-*

असे थेटपणे लिहिणारे- बोलणारे, "प्रबोधन"कार ठाकरे "देवळांचा धर्म, धमार्ची देवळे"मध्ये लिहितात, "देवळातील मूर्ती म्हणजे देव नव्हे! केवळ धोंडा. भातुकलीच्या खेळातल्या बाहुलीसारखी क्षुद्र वस्तू. हे पुजारी, भटदलालांपासून ते तिच्यापुढे कपाळे घासणाऱ्या भक्त-




भक्तिणींपर्यंत सर्वांना स्वच्छ माहिती असते. असल्या धोंड्याची पूजा-प्रार्थना करून, आत्मोन्नती होणे शक्य नाही; आणि प्राणावर बेतले तर हा शृंगारलेला दगड स्वतःचे किंवा भक्तांचे मुळीच संरक्षण अगर तारण करू शकणार नाही, हे प्रत्येक हिंदूला कळते. तरीही देवळातल्या घंटा बडवायला सांज-सकाळ कोट्यवधी हिंदू का जातात? बाप, आजे, पणजे गेले म्हणून जातात; का, त्यांना एखादी गुप्त जादू तेथे ओढून नेते! हिंदू लोकांची देवळ्या देवांविषयीची भावना सरळ आणि अत्यंत प्रेमाची असती; तर हिंदुस्थानात मुसलमानी बडग्याला एकही देऊळ व देव नक्कीच बळी पडला नसता! अर्थात, नाटके, सिनेमे, तमाशाची थिएटरे जशी क्षणभर विरंगुळ्याची ठिकाणे असतात. करमणूकच्या करमणूक आणि पटला काही उपदेश तर पटला; नाही तर निसटला! यापेक्षा देवळांची विशेष किंमत हिंदू लोकांनी बाळगलेली दिसत नाही. तरीही देव-देवळांविषयी शाब्दिक प्रेमाचा हिंदू जिव्हेचा धबधबा पाहावा; तो त्याच्या धडधडाटापुढे गिरसप्पा, नायगाराच्या कानठळ्या बसतात! हे काय भटीबंगाल आहे? हे भटबंगाल हिंदुस्तानाच्या नकाशात सापडणारे नसून ते थेट भटाच्या पोटात आहे! देवळांचा धर्म म्हणजे भटाच्या पोटाचे गुप्त मर्म आहे. या ममार्चे वर्म अफाट भटेतरांना कधीच उमगू नये, म्हणून भटांनी अठरा पुराणांची पैदास करून ठेवलेली आहे. गीता व उपनिषद आदी विचार- क्रांतिकारक आणि सत्यशोधक ग्रंथ कितीही असले, तरी देवळांवर देह जगवणाऱ्या या भूदेवांचा विशेष मारा पुराणांवरच असतो. पुराणांच्या पचनी पडलेला प्रत्येक प्राणी; ईश्वरविषयक कल्पनेत इतका पागल बनतो की, दगड्या देवाच्या पायाऐवजी तो भटाच्या पायावर टाळकी घासतो आणि त्याचे पाय धुतलेले पाणी "पवित्र तीर्थ" म्हणून घटाघटा पितो. देवळात कथा, कीर्तने, पुराणे, प्रवचने होतात. पण सर्वांची झाप छिनाल भागवतावर आणि पाचकळ पुराणांवरच असते."

१८ पुराणांत तिसरे "विष्णू पुराण" आहे. पुराणांना "प्रबोधन"कार पाचकळ म्हणतात. कारण त्यात देवलोकांच्या बऱ्याच भानगडी आहेत. त्यातही कल्पनाविलास ठासून भरलाय. अशा भगवान विष्णूचा सातवा अवतार म्हणजे प्रभू रामचंद्र! ज्याचा जन्मच कल्पना-विस्तारात झालाय; त्याचे जन्मस्थानही काल्पनिकच असणार! पण त्यातूनही आपल्या देशात अधर्म आणि दहशतीचे; हिंदू- मुस्लिम द्वेषाचे रामायण-महाभारत दोन्ही एकाच वेळी घडलं; घडत आहे. संत गाडगे महाराज सांगत, "देवळात पुजाऱ्याचे पोट असते." त्या पोटाला आता ट्रस्टी - पदाधिकारी ह्या चौकीदारांची; आणि देवळाचा कारभार शासकीय ट्रस्ट अंतर्गत असेल, तर त्यांना नेमणाऱ्या बड्या चौकीदारांची पोटे जोडलेली असतात. ही साखळी तयार होते, तेव्हा भ्रष्टाचार सराईतपणे होतो. असेच सर्वच धर्मांच्या धर्म/प्रार्थनास्थळांमध्ये चालते. फक्त झोलझपाट्यात भिन्नता असते. कोल्हापूर, सांगली आणि सिंधुदुर्ग ह्या जिल्ह्यांची मिळून "पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती" नावाची शासकीय समिती आहे. ह्या समितीच्या अखत्यारीत तीन जिल्ह्यांतील ३,००० हजार मंदिरं आणि त्यांची २६,००० एकर जमीन आहे. ह्या जमिनी राजे- महाराजांनी आणि दानशूरांनी दिल्या आहेत. ह्या जमिनींच्या उत्पन्नातून देवळाच्या देखभाल- दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध व्हावा, हा उद्देश दान करणाऱ्यांचा होता. दरम्यान, त्या जमिनी उत्पन्नासाठी ज्यांना कसायला दिल्या होत्या, त्यांनीच हडप केल्यात. परस्पर विकल्या. ह्या हडपेगिरीत देवळाच्या ब्राह्मण- भटांनी आघाडी मारली असून, त्यांना समिती सदस्यांनीही साथ दिली आहे.

अशी साथीदारी अयोध्येतील मंदिर घोटाळ्यात चंपत राय बन्सल यांचीही होती; म्हणून त्यांची ट्रस्टच्या सरचिटणीस पदावरून आणि अनिल मिश्रा, गोपाळ राव यांची विश्वस्त पदावरून हकालपट्टी झाली. हिंदीत "चंपत"चा अर्थ गायब/फरार होणे, असा होतो. चंपत राय स्वतः गायब/फरार झाले नाही; मुद्देमालावर निभावले, हे बरेच झाले! ह्या घोटाळ्यात संघ-भाजप परिवाराशी संबंधित लोक सापडावेत, हा योगायोग नाही; आणि अनपेक्षितही नाही. कारण त्यांची ट्रस्टवर नेमणूक बडा चौकीदार "मोदी सरकार"ने केली होती. तसेच, रामलल्ला जागृत झाल्याने किंवा शंकराचार्यांना टाळून रामजन्मभूमी मंदिराचे उद्घाटन केल्याने त्यांची "शापवाणी" बाधली, असेही नाही. सत्ता सत्ताधारीचे खरे रूप दाखवते, हेच सत्य आहे. या प्रकरणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबाळे यांनी संताप व्यक्त केलाय. पण त्यात जबाबदारी न स्वीकारता, कांगावा अधिक केला आहे. "चढावा चोरी"चे हे प्रकरण ज्येष्ठ कारसेवक संतोष दुबे यांनी लावून धरले आहे. "एसआयटी हा देखावा आहे. त्यामुळे खऱ्या गुन्हेगारांना शिक्षा होणार नाही. कारण ह्या प्रकरणी मुख्यमंत्री आदित्य योगी यांचे हात प्रधानमंत्र्यांनी आणि नागपूरच्या रेशीमबागेने बांधून ठेवले आहेत," हे संतोष दुबे यांचे म्हणणे खरेच आहे. कारण ह्या केंद्र सरकारच्या ताब्यातील ट्रस्टवर दरोडेखोरांची नेमणूक करणारे चौकीदार चिडीचूप आहेत. कारण तोंड उघडलं तर अब्जावधी रूपयांचा "पी. एम. केअर फंड"चा हिशेब द्यावा लागेल, अशी भिती त्यांना वाटत असावी.

देव-देवळं हा साधू-संन्यासी आणि भट-भिक्षुकांचा पोट भरण्याचा उद्योग आहे. भक्त-भाविक त्याची गिऱ्हाईकं आहेत. हा उद्योग 'संघ-भाजप' परिवाराने सत्तालाभासाठी आपल्या ताब्यात घेतलाय. म्हणजे, मुळातला खोटा धंदा सोंगाकडून ढोंगाकडे गेलाय. हे सोंगा- ढोंगाचे नाटक बिनदिक्कत चालू राहावे, यासाठी उमा भारती, आदित्य योगी यांसारख्या साध्वी- साधूंना राज्याचे मुख्यमंत्री बनवून परमार्थाचेही प्रदर्शन करण्यात आलेय. तथापि, ह्यातील मूळच्या खोटेपणाची हजामत करताना स्वामी विवेकानंद म्हणतात, "हिंदुस्थानातील साधू-संन्याशांनी, पुरोहितांनी गरिबांसाठी काय केलं? त्यांना अध्यात्म शिकवलं! भुकेल्या माणसाला परमार्थ सांगणं, ही धमार्ची शुद्ध चेष्टा आहे! आज लक्षावधी लोक अन्नान्न करीत आहेत. ही जनता परमेश्वर नाही का? भारताचे भवितव्य ह्या जनतेवर अवलंबून आहे!" हे चौकीदारच चोर असतील तर कोणाला ऐकवायचं?



**ज्ञानेश महाराव**
(ज्येष्ठ पत्रकार- संपादक)

# स्थगिती म्हणजे रद्द नव्हे

**माहितीचा अधिकार नियम, २०२६ संदर्भातील गैरसमज दूर होणे आवश्यक**

महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेले महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ हे नियम राज्य माहिती आयोगाच्या पत्रानुसार स्थगित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या पत्रानंतर अनेक स्तरांवर "नियम रद्द झाले" अशा चर्चा सुरू झाल्या. मात्र कायद्याच्या दृष्टीने "स्थगित" आणि "रद्द" या दोन्ही संज्ञांचा अर्थ पूर्णपणे वेगळा आहे. त्यामुळे नागरिकांनी तसेच प्रसारमाध्यमांनी या दोन संकल्पनांतील मूलभूत फरक समजून घेणे आवश्यक आहे.

कायद्यात स्थगिती म्हणजे एखाद्या आदेशाची किंवा नियमाची अंमलबजावणी तात्पुरती थांबविणे होय. त्या नियमाचे अस्तित्व संपत नाही. तो नियम कायदेशीररीत्या अस्तित्वात राहतो; फक्त त्याची अंमलबजावणी पुढील आदेशापर्यंत रोखली जाते. दुसरीकडे रद्द म्हणजे त्या नियमाचा किंवा आदेशाचा कायदेशीर अंत होणे. एकदा नियम रद्द झाला की तो पुन्हा लागू करण्यासाठी नव्याने अधिसूचना किंवा नियम बनविण्याची प्रक्रिया करावी लागते.

राज्य माहिती आयोगाच्या २ जुलै २०२६ च्या पत्रात स्पष्ट शब्दांत "स्थगित करण्यात येत आहेत" असा उल्लेख आहे. कुठेही "रद्द करण्यात येत आहेत" असे नमूद केलेले नाही. त्यामुळे हे नियम कायमचे रद्द झाले आहेत, असा निष्कर्ष काढणे कायदेशीरदृष्ट्या योग्य ठरणार नाही.

याचा अर्थ एवढाच की, सध्या या नियमांची अंमलबजावणी होणार नाही. परंतु शासनाने भविष्यात स्थगिती उठविल्यास किंवा नवीन निर्णय घेतल्यास हेच नियम पुन्हा लागू होऊ शकतात. त्यामुळे स्थगितीला अंतिम निर्णय समजणे चुकीचे आहे.

लोकशाहीमध्ये माहितीचा अधिकार हा केवळ कायदा नसून नागरिकांच्या पारदर्शक शासनाच्या अधिकाराशी जोडलेला मूलभूत घटक आहे. त्यामुळे या कायद्याशी संबंधित प्रत्येक निर्णय हा अत्यंत



**ॲड. नाना वकील चेळेकर**
जिल्हा व सत्र न्यायालय,
अधिवक्ता
९८६०८२००५७

संवेदनशील असतो. शासनाने नियम स्थगित करण्यामागील कारणे स्पष्ट करणे आणि पुढील दिशा जाहीर करणे ही पारदर्शक प्रशासनाची जबाबदारी आहे.

प्रसारमाध्यमे आणि सामाजिक माध्यमांवर कायदेशीर संज्ञांचा चुकीचा अर्थ लावल्याने नागरिकांमध्ये गोंधळ निर्माण होतो. त्यामुळे "स्थगित" आणि "रद्द" यांतील फरक समजून घेऊनच बातम्या व प्रतिक्रिया दिल्या पाहिजेत. कायद्यात प्रत्येक शब्दाला विशिष्ट अर्थ असतो आणि त्या एका शब्दामुळे नागरिकांचे अधिकार, शासनाची जबाबदारी आणि न्यायालयीन प्रक्रिया यांवर दूरगामी परिणाम होऊ शकतो.

माहितीचा अधिकार हा लोकशाहीचा पाया आहे. त्यामुळे नियमांमध्ये बदल, स्थगिती किंवा रद्दबातल यांसारख्या प्रत्येक निर्णयाकडे भावनिक नव्हे तर कायदेशीर आणि वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून पाहणे ही काळाची गरज आहे. आजची स्थगिती हा अंतिम निर्णय नसून केवळ तात्पुरता प्रशासकीय टप्पा आहे. पुढील शासन निर्णय किंवा अधिसूचनेनंतरच या नियमांचे अंतिम भविष्य निश्चित होईल.

लोकशाहीत पारदर्शकता टिकवायची असेल, तर कायद्याचा प्रत्येक शब्द समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. "स्थगिती" आणि "रद्द" यांतील फरक समजला, तर या संपूर्ण वादाचे खरे स्वरूपही स्पष्ट होईल.

# सहायता वेलफेअर फाऊंडेशन जपतेय सामाजिक बांधिलकी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूजकरांवर अभूतपूर्व असे पाणी टंचाईचे संकट आले असून, अकलूज येथील सहायता वेलफेअर फाऊंडेशन यांनी सुद्धा मोफत पाणी उपलब्ध करून देण्याचा विडा उचलला असल्याचे फाउंडेशनचे अध्यक्ष तथा नगरसेवक मोहसीन शेख यांनी सांगितले.

पाणी हेच जीवन आहे आणि यामुळेच सृष्टी आहे. परंतु निसर्ग कधी चमत्कार करेल हे कोणीही ठामपणे सांगू शकणार नाही किंवा प्रकोप करेल हे सुद्धा कोण ठामपणे सांगू शकत नाही !कारण यावेळी पाच महिने सूर्याच्या प्रखर दाहकतेचा सामना सवार्नाच करावा लागला.जूनचा पाऊस,जुलै महिन्यात सुरू झाला. तत्पूर्वी बऱ्यापैकी धरणातील पाण्याची पातळी बरीच कमी झाली आणि पाण्याचे संकट वाढले, म्हणून आम्हीही खारीचा वाटा उचलला असे अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक मोहसीन शेख म्हणाले.

पुढे बोलताना शेख म्हणाले, सहायता वेलफेअर फाउंडेशन, अकलूज यांच्या विद्यमाने प्रभाग क्र. ४ मधील कौलारू शाळेसमोर, हनुमान मंदिर परिसर, जुनी ग्रामपंचायत परिसर, मुल्ला गल्ली, शनी मंदिर-काझी गल्ली तसेच देशमुख गल्ली परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार आज मुबलक प्रमाणात पाण्याचे वितरण करण्यात आले.तर प्रभागातील नागरिकांना आगामी काही दिवस पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो? या पार्श्वभूमीवर, घरगुती बोअरवेल धारकांनी आपल्या परिसरातील गरजू नागरिकांना पाणी उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन सहायता वेलफेअर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा नगरसेवक मोहसिन शेख यांनी केले आहे. तसेच, नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून पाणी काटकसरीने व जबाबदारीने वापरावे, असेही आवाहन केले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# २४९ रोजंदारी सेवक, १५ वाहनचालक, जुनी पेन्शन व विविध कर्मचारी प्रश्नांवर बैठक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई मंत्रालय येथे झालेल्या बैठकीत सोलापूर महानगरपालिकेतील विविध कर्मचारी प्रश्नांबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर आज सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली महापौर कार्यालयात सविस्तर आढावा बैठक पार पडली.

सोलापूर महानगरपालिकेतील २४९ रोजंदारी सेवकांना कायम करणे, १५ वाहनचालकांना कायम सेवेत समाविष्ट करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, महागाई भत्ता तसेच विविध प्रलंबित कर्मचारी प्रश्नांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

महानगरपालिकेतील विविध कामगार संघटना व कर्मचारी प्रतिनिधींनी २४९ रोजंदारी सेवक, लाड-पागे सेवक, अनुकंपा नियुक्ती, वाहनचालक तसेच इतर कर्मचारी वर्गाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत सातत्याने मागण्या केल्या आहेत. या सर्व मागण्यांवर प्रशासन स्तरावर आवश्यक कार्यवाही करून शासनाकडे प्रभावी प्रस्ताव सादर करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागप्रमुख व कामगार संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत ही बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीत २४९ रोजंदारी सेवकांना कोल्हापूर व नागपूर महानगरपालिकेच्या धर्तीवर कायम करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच या सेवकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव शासनाकडे पाठवून त्यासंदर्भात शासनस्तरावर प्रभावी पाठपुरावा करण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली.

तसेच महानगरपालिकेतील १५ वाहनचालकांना कायम सेवेत समाविष्ट करणे, कर्मचाऱ्यांचा थकीत महागाई भत्ता अदा करणे, लाड-पागे सेवकांच्या नियुक्त्या, अनुकंपा नियुक्तीची प्रकरणे, रोजंदारी वाहनचालक, आरसीएच, लिंक वर्कर (आशा वर्कर), नर्सेस, एएनएम, पीएचएन,



जीएनएम, बालवाडी सेविका, परिवहन विभाग, शहर क्षयरोग केंद्र, घनकचरा व्यवस्थापन विभाग, वर्ग-४ कर्मचारी तसेच इतर विभागांतील विविध कर्मचारी प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

याशिवाय सुधारित आकृतिबंध, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन, निवृत्त कर्मचाऱ्यांचे आर्थिक लाभ, डॉक्टरांच्या पदनिर्मिती, मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा नियुक्ती, वर्ग-४ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ, सरळसेवा भरती आदी विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. संबंधित विभागांनी आवश्यक माहिती व प्रस्ताव तातडीने सादर करून शासनाकडे पाठवावेत, अशा सूचना महापौरांनी दिल्या.

यावेळी महापौर विनायक कोंड्याल म्हणाले, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बैठकीत कर्मचारी प्रश्नांबाबत सकारात्मक चर्चा झाली असून पालकमंत्री जयकुमार गोरे व आमदार देवेंद्र कोठे यांच्या पाठपुराव्यामुळे या विषयांना गती मिळाली आहे. २४९ रोजंदारी सेवकांना कोल्हापूर व नागपूर महानगरपालिकेप्रमाणे कायम करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. तसेच त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी आवश्यक पाठपुरावा केला जाईल. महापालिकेतील १५ वाहनचालकांना कायम सेवेत समाविष्ट करणे, कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता तसेच इतर न्याय्य मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय व्हावा यासाठी महानगरपालिका प्रशासनामार्फत शासनाकडे प्रभावी पाठपुरावा करण्यात येईल."

बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, सभागृह नेते नरेंद्रजी काळे, शहराध्यक्ष तथा नगरसेविका रोहिणी ताई तडवळकर, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, मुख्यलेखा अधिकारी रत्नराज जवळगेकर, उपायुक्त सोनाली यादव, उपायुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, सहाय्यक आयुक्त विनोद कुलकर्णी, नगर अभियंता सारिका आकुलवार, कार्यालय प्रमुख रजाक पेंढारी, सफाई अधीक्षक चराटे, उपअभियंता नीलकंठ मठपती तसेच कामगार संघटनांचे प्रतिनिधी अशोक जानराव, बाली मंडेपु, बापू सदाफुले, जनार्दन शिंदे, अशोक होटकर, दिलावर मन्यार, शेषराव शिरसाट, सायमन गड्ड, रामचंद्र चंदनशिवे, इकबाल तडकल, लिंगराज जटीथोर, डॉ. एस. प्रसाद आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी रात्री वीज द्या

## महावितरणाकडे औंदुबरराजे भोसले यांचे निवेदन

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा प्रश्न ऐरणीवर आला असून, शेतात राहणाऱ्या कुटुंबांतील विद्यार्थ्यांना रात्रीच्या वेळेत वीज उपलब्ध नसल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी रात्री वीज सुरू ठेवावी, अशी मागणी करत नेरले येथील मा.सरपंच तथा भाजप करमाळा मंडळ अध्यक्ष श्रीमंत औंदुबरराजे भोसले यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, करमाळा कार्यालयाकडे निवेदन दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, करमाळा तालुक्यातील ग्रामीण भागात सुमारे ९० टक्के कुटुंबे शेतामध्ये वास्तव्यास आहेत. या भागात शेतीसाठी दिला जाणारा थ्री फेज वीजपुरवठा केवळ चार तास, तर काही ठिकाणी सहा तास सुरू असतो. विशेष म्हणजे हा पुरवठा अनेकदा रात्री दहा वाजल्यानंतर सुरू होऊन सकाळी सहा वाजता बंद केला जातो. त्यामुळे शेतात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रात्री अभ्यास करणे कठीण होत असून, त्याचा थेट परिणाम त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सध्या शिक्षण ही काळाची गरज बनली आहे. शासनाकडून



मुलामुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात असताना, दुसरीकडे ग्रामीण भागातील विद्यार्थी मात्र वीजअभावी अभ्यासापासून वंचित राहत असल्याची खंत निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश नसल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अनुकूल वातावरण मिळत नाही. परीक्षांचा काळ, गृहपाठ, स्पर्धा परीक्षा किंवा दैनंदिन शालेय अभ्यास यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचेही या निवेदनात म्हटले आहे.

विद्यार्थ्यांबरोबरच शेतकऱ्यांच्याही अडचणी या प्रश्नाशी जोडलेल्या आहेत. शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतातील कामे करावी लागतात. त्याचबरोबर चोरीच्या घटना, वन्यप्राण्यांचा धोका आणि पिकांच्या संरक्षणाचा प्रश्न यामुळे शेतात वीज असणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः रात्री ६ ते सकाळी ६ वाजेपर्यंत वीज उपलब्ध राहणे आवश्यक असल्याची मागणी करण्यात आली आहे.

महावितरणकडे तांत्रिक अडचणी असतील, तरी त्या कारणास्तव विद्यार्थी आणि शेतकरी अडचणीत येऊ नयेत, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. विभागातील अभियंत्यांनी आपल्या तांत्रिक कौशल्याचा वापर करून योग्य नियोजन करावे आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी तसेच शेतकऱ्यांच्या गरजांसाठी रात्रीचा वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी मागणी श्रीमंत औंदुबरराजे भोसले यांनी केली आहे.


या निवेदनामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला असून, महावितरण प्रशासन याबाबत काय निर्णय घेते, याकडे आता तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# जान्हवी फौंडेशन तर्फे वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** जान्हवी फौंडेशन तर्फे वारकऱ्यांसाठी दरवर्षी प्रमाणे यावर्षी शुकवार दि १०/०७/२६ रोजी पुण्यातील नाना पेठ येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर दुपारी १२ वा आयोजित करण्यात येणार. डॉ विक्रम गायकवाड यांनी वारीतील वारकऱ्यांची मोफत तपासणी केले जाणार आहे. या शिबिरात वारकऱ्यांना किमान पंधरा दिवस पुरतील एवढ्या औषध,गोळ्या,देण्यात येतील. तसेच प्राथमिक उपचार, योग व्यायामाचे मार्गदर्शन करण्यात येईल. हे शिबीर जान्हवी फौंडेशनच्या वतीने घेण्यात येणार आहे असे डॉ विक्रम गायकवाड यांनी सांगितले.

# मार्तंडे स्मृती दिनानिमित्त मार्डीत ६४८ जणांचे रक्तदान

**उत्तर सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक कै. श्रीधर मार्तंडे यांच्या स्मृती दिनानिमित्त मार्डी येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल ६४८ रक्तदात्यांनी रक्तदान** करून सामाजिक बांधिलकी जपली.



या निमित्ताने दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप बाजार समितीचे सभापती दिलीप माने आणि भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, पंचायत समितीच्या सभापती तेजस्विनी बोराडे, उपसभापती सुनील भोसले, सदस्या सुनीता बारसकर, ज्येष्ठ नेते बाळासाहेब देशमुख, शिवाजी सोनार, शत्रुघ्न घोडके, कार्यक्रमाचे संयोजक अविनाश मार्तंडे, ज्योती मार्तंडे, शैलेश मार्तंडे, जयदत्त मार्तंडे, विशाल मार्तंडे, राज पाटील, नागराज पाटील, बाळासाहेब पाटील, शिवसेना ओबीसी सेल महिला आघाडी जिल्हाध्यक्षा उमा माळी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

रक्तदान शिबिरात अक्षय ब्लड बँक, सिद्धेश्वर ब्लड बँक आणि मेडिकेअर ब्लड बँक यांनी रक्तसंकलनाची जबाबदारी पार पाडली.

यावेळी बोलताना सभापती दिलीप माने म्हणाले की, "कै. श्रीधरराव मार्तंडे यांचे सर्वपक्षीय नेत्यांशी जिव्हाळ्याचे आणि सलोख्याचे संबंध होते. त्यांचा हाच लोकसंग्रह व सामाजिक वारसा अविनाश मार्तंडे यांनी समर्थपणे पुढे नेला आहे."

भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार यांनी सांगितले की, "गेल्या २० वर्षापासून सातत्याने आयोजित करण्यात येणारे हे रक्तदान शिबिर समाजासाठी अत्यंत लोकोपयोगी ठरत असून अनेक गरजू रुग्णांना त्याचा लाभ होत आहे."

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव गवळी यांनी केले, तर दत्ता मोकाशी, चंद्रकांत शिंदे आणि कमलाकर जाधव यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास नागरिक, रक्तदाते आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सामाजिक न्याय विभागाकडून 20 गटई कामगारांना पत्र्याच्या स्टॉलचे वाटप



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या गटई स्टॉल योजनेंतर्गत आज 20 पात्र लाभार्थ्यांना पत्र्याच्या स्टॉलचे वाटप करण्यात आले. आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, सोलापूर येथे सहायक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली व हस्ते हा कार्यक्रम पार पडला.

**1977 पासून योजना कार्यान्वित**

गटई स्टॉल योजना 1977 पासून शासनाने अनुसूचित जातीतील चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी समाजातील लोकांसाठी सुरू केली आहे. महाराष्ट्रात चामड्याच्या वस्तू व पादत्राणे दुरुस्तीच्या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर अनुसूचित जातीतील व्यक्ती कार्यरत आहेत. हे व्यावसायिक रस्त्याच्या कडेला उन्हातान्हात बसून सेवा देत असतात. त्यांना ऊन, वारा व पावसापासून संरक्षण मिळावे व आर्थिक उन्नती व्हावी यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका क्षेत्रात 100 टक्के सहायक अनुदानावर गटई स्टॉल देण्याची योजना राबविण्यात येते.

**अनुदानाची रक्कम-**

सदर योजनेंतर्गत प्रति गटई स्टॉलसाठी रु. 42,797.50 व चर्मोद्योग/पादत्राणे व्यवसायासाठी आवश्यक साहित्य खरेदीसाठी प्रति लाभार्थी रु. 5000 प्रमाणे 100 टक्के सहायक अनुदानावर लाभ दिला जातो. आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये या योजनेसाठी एकूण रु. 9,80,000 इतके अनुदान कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे.

या कार्यक्रमात सहायक आयुक्त समाज कल्याण, सोलापूर सुलोचना सोनवणे यांच्या हस्ते 20 लाभार्थी गटई कामगारांना स्टॉलचे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यालय व वसतिगृहातील अधिकारी-कर्मचारी तसेच योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्थानिकांचे व्यवसाय हटवून परप्रांतियांना जागा देणार का?



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त) :-** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने राबविलेल्या अतिक्रमण हटाव कारवाईवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप धोत्रे यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. अतिक्रमण हटविण्यास विरोध नसला, तरी संबंधित व्यावसायिकांशी कोणतीही बैठक न घेता, त्यांना आपली बाजू मांडण्याची संधी न देता हुकूमशाही पद्धतीने कारवाई करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

पत्रकार परिषदेत बोलताना धोत्रे म्हणाले की, वर्षानुवर्षे व्यवसाय करून उदरनिर्वाह करणाऱ्या स्थानिक तरुणांची दुकाने आणि व्यवसाय उद्ध्वस्त करण्यात आले. "स्थानिकांना हटवून बाहेरून येणाऱ्या परप्रांतियांना वारीत व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न होत नाही ना, याची चौकशी झाली पाहिजे," अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी कारवाईमुळे व्यवसाय बंद पडलेल्या चंद्रशेखर मिरजकर, रतन काळे, सूरज पेंडाल आणि कबीरकुमार कदम या व्यावसायिकांना मनसेच्या वतीने प्रत्येकी १० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. या प्रसंगी नगरसेवक संजय बंदपट्टे, किरणराज घाडगे, लोकेश यादव आणि प्रसाद कळसे उपस्थित होते.

धोत्रे यांनी नगरपालिकेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, "नगरपालिकेकडे कायमस्वरूपी अतिक्रमण विरोधी पथक असताना अतिक्रमणे झालीच कशी? नियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत. पूर्वी स्थानिक फेरीवाल्यांना पयार्यी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला होता. अनेक फेरीवाल्यांची अधिकृत नोंदणीही नगरपालिकेकडे आहे. अशा नोंदणीकृत व्यावसायिकांनाच अतिक्रमणधारक ठरवून कारवाई करणे योग्य नाही," असे स्पष्ट केले.

**अवैध धंद्यांवरही कारवाई करा**

शहरातील काही प्रभावशाली व्यक्ती शासकीय व खुल्या जागांवर अतिक्रमण करून तेथील झोपड्या व खोकीधारकांकडून पैसे वसूल करीत असल्याच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना दिलीप धोत्रे म्हणाले की, अशा अतिक्रमणांमधून सुरू असलेले अवैध धंदे प्रशासनाने तातडीने उद्ध्वस्त करावेत. हातावर पोट असलेल्या गोरगरीब व्यावसायिकांवर कारवाई करण्याऐवजी त्यांच्यासाठी पयार्यी जागा व पुनर्वसनाचा विचार करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.


# Classified - छोटी जाहीरात

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.

**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


# कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नाना पाटेकर, अनिल कपूर, अक्षय कुमार यांचा एक विनोदी चित्रपट, स्वागत (इंग्रजीत) २) पोवाडे गाणारा ३) उलटी, वमन ४) बारा गुणिले पाच ५) याचे कणिस भाजून खातात ६) क्रिकेटमधील सिक्सर (मराठीत) ९) दहा गुणिले सात ११) चौघड्याच्या जोडीचे वाद्य १२) तोपर्यंत (ग्रामीण भाषेत) १४) सर्वत्र पसरलेला सुगंध १५) पुरूषांचा नेसावयाचा पंचा २१) श्वास घेण्याची क्रिया २३) छोटा दिवा २४) कपाची जोडीदारीण २६) पटकन, त्वरेने एक फुलझाड २९) झी मराठी वरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या ३०) विदूषक ३३) विषमच्या विरूध्दार्थी ३५) पाच आणि दोन मिळून होणारी संख्या ३७) छोटा, बारीक ३९) पतीची आई ४०) एक अभिनेता-**** खान ४१) इराकची राजधानी ४३) कापड फाटताना होणारा आवाज ४४) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात ४५) मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता-*** भावे ४७) बोल्टचा जोडीदार, टन उलट लिहा ४९) पैसा, संपत्ती ५१) कविता बनविणारा

**आडवे शब्द :** १) हवामानाचा अंदाज वर्तविणारे कार्यालय ३) भारताचे दक्षिणेकडील एक राज्य ५) एक भारतीय फलंदाज-*** पांडे ७) मांजरामधील नर जात ८) अन्नाचा कण श्वासनलिकेत गेल्यास लागतो *** १०) व्यायाम, मेहनत १३) रांग, माळ १५) खतरा १६) माईंड (मराठीत), चित्त १७) जंगल, अरण्य १८) आई (इंग्रजीत) १९) जरचा साथीदार २०) देव २२) एक मराठी महिना २३) परंतु, पक्ष्याचे पंख (हिंदीत) २५) कोकणातील एक पर्यटनाचे स्थळ २७) उन्हाळ्यातील एक महिना २८) मराठी चित्रपट सृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेते ३१) वट उलट लिहा ३२) पंधरा दुणे ३४) रानटी बैल ३६) उद्या (हिंदीत) ३८) शरीरावरील मोठा तीळ ४०) लिंबू पाण्याचे पेय ४२) विहिरीतून पाणी खेचण्याचे पूर्वीचे चक्राकार साधन ४४) वर्ष (हिंदीत) ४६) मादीच्या विरूध्दार्थी ४७) नव्वदच्या दशकातील हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेत्री ४८) समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ५०) कडक, न दबणारे ५२) नऊ गुणिले दहा ५३) मेंढीपालन करणारा एक वर्ग

# सुडोकु - 294

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | | 7 | | 4 | 3 | |
| | 5 | 1 | 3 | | | 2 | | 6 |
| | 7 | | | | 6 | | | 1 |
| 6 | | | | | | 7 | | 9 |
| 7 | 3 | | 5 | | | | 1 | |
| | | 9 | | 6 | 4 | | | 8 |
| 5 | 6 | 8 | | 2 | 7 | 1 | | 3 |
| 3 | | 2 | | 1 | | | | |
| | | 7 | | 8 | 3 | 5 | 2 | |

# जि. प. शाळांच्या गुणवत्तेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करू : शांभवी कल्याणशेट्टी



**बोरेगाव (कटूसत्य वृत्त):** अक्कलकोट तालुक्यातील चपळगाव जिल्हा परिषद मतदारसंघाच्या सदस्या शांभवी कल्याणशेट्टी यांनी मतदारसंघातील विविध अंगणवाड्या आणि जिल्हा परिषद शाळांना भेट देत शिक्षणाची गुणवत्ता, पोषण आहार तसेच मूलभूत सुविधांची पाहणी केली. यावेळी शाळांचा सर्वांगीण विकास, विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्याशी संवाद साधताना त्या म्हणाल्या, "अंगणवाडी हे बालकांच्या शिक्षणाचे पहिले पाऊल आहे. या टप्प्यावर मुलांना दर्जेदार, आनंददायी आणि संस्कारक्षम शिक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील."

या पाहणी दौऱ्यात त्यांनी चपळगाव, चपळगाववाडी, बऱ्हाणपूर, डोंबरजवळगे, नन्हेगाव, पितापूर आणि बोरेगाव येथील अंगणवाड्या व जिल्हा परिषद शाळांना भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला. शाळांमधील सुविधा, विद्यार्थ्यांची उपस्थिती, पोषण आहाराची गुणवत्ता आणि विविध आवश्यक बाबींची माहिती त्यांनी संबंधितांकडून जाणून घेतली.

यावेळी मुख्याध्यापक केदार कोळी, मुख्याध्यापिका लता सोनवणे, अंगणवाडी सेविका गीता होदलुरे, तनुजा बिराजदार, मदतनीस इरव्वा इंडे, बोरेगावचे सरपंच गौरीशंकर स्वामी, माजी सरपंच उमाकांत गाडवे यांच्यासह शिक्षक, अंगणवाडी कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# डॉ.धवलसिंहाचा बलराज अश्व संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यासाठी देहूकडे रवाना



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** डॉ. धवलसिंह प्रतापसिंह मोहिते पाटील यांचा बलराज अश्व, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यासाठी देहूकडे रवाना करण्यात आला. डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांच्या प्रतापगड येथील निवासस्थानी, बलराज अश्वाची पूजा करण्यात आली.यावेळी डॉ. धवलसिंह मोहिते पाटील, उर्वशीराजे धवलसिंह मोहिते पाटील व पद्मजादेवी मोहिते पाटील यांनी बलराज अश्वाचे पूजन केले. यावेळी भाविकांनी ज्ञानोबा तुकाराम म्हणत, टाळ मृदंगांच्या गजरात बलराज या आश्वाला मार्गस्थ केला. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. धवलसिंह मोहिते पाटील म्हणाले की सालाबाद प्रमाणे, वर्षानुवर्ष आश्वसेवेच्या माध्यमातून, भक्ती भावाने, आमचे वडील कै. प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी अश्व सेवेची परंपरा सुरू केली. ही परंपरा माज्या कुटुंबाच्या माध्यमातून चालू आहे. अतिशय भावनिक क्षण हा आमच्यासाठी असतो, कारण जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखीमध्ये आश्वाच्या माध्यमातून, सेवा आमच्या कुटुंबाच्या वतीने घडते. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे रिंगण हे अकलूज मध्ये होते. बलराज अश्वने अनेक वाऱ्या पालखीच्या केल्या आहेत. तो चांगल्या पद्धतीने रिंगण सोहळा पार पाडतो. बलराज अश्व हा मारवाड जातीचा घोडा असून, तो साडेसात वर्षाचा असल्याचे डॉ.धवलसिंह मोहिते पाटील म्हणाले.

# लोकनेते स्व. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांना विनम्र अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना, सोलापूर शहर यांच्या वतीने पार्क चौक येथील जनसेवा संघटनेच्या कार्यालयात माजी सहकारमंत्री, लोकनेते स्वर्गीय प्रतापसिंह (पप्पासाहेब) शंकरराव मोहिते–पाटील साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पप्पासाहेबांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी आयुष्यभर जनसेवा, सहकार, शिक्षण आणि ग्रामीण विकासाला प्राधान्य दिले. कार्यकर्त्यांवरील त्यांचे अपार प्रेम, सर्वसामान्य जनतेप्रती असलेली आत्मीयता, विकासाची दूरदृष्टी आणि समाजहिताची तळमळ आजही असंख्य कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी "नेते अनेक झाले, पण कार्यकर्त्यांच्या मनात घर करणारा असा नेता पुन्हा होणे नाही...!" या शब्दांत उपस्थितांनी आपल्या भावना व्यक्त करून पप्पासाहेबांना आदरांजली वाहिली.

या अभिवादन कार्यक्रमास शिरीष जगदाळे, सतीश वावरे, ज्योतिबा गुंड, शिवराज विभुते, अजय सोमदळे, दिलीप भोसले, श्रेयस माने, सचिन मस्के, दिलीप निंबाळकर, नाना कामाने, साळुंखे, सचिन थोरात तसेच पप्पासाहेबांचे अनेक कार्यकर्ते व जनसेवा संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ए.आय.चा वापर गरजेपुरताच करा; त्याचे गुलाम बनू नका : माजी सरन्यायाधीश भूषण गवई



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** न्यायव्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) उपयुक्त ठरत असली तरी त्यावर अति अवलंबून राहू नये. गरजेनुसार ए.आय.चा वापर करावा, त्याचे गुलाम बनू नका; उलट ए.आय.ला आपल्या कामाचे साधन बनवा, असे आवाहन भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

सोलापूर बार असोसिएशनच्या वतीने रविवारी हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित एकदिवसीय कायदेविषयक चर्चासत्र (लीगल कॉन्फरन्स) मध्ये ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

गवई म्हणाले की, दिवसेंदिवस कायदे बदलत आहेत, न्यायालयांचे नवे निकाल समोर येत आहेत. त्यामुळे प्रत्येक वकिलाने सातत्याने अद्ययावत राहणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून त्याचा प्रभावी वापर करावा, मात्र अंतिम निर्णयासाठी स्वतःची कायदेशीर समज, अभ्यास आणि विवेक यांनाच प्राधान्य द्यावे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव होते. यावेळी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती निजामोद्दिन जे. जमादार, मिलिंद जाधव, माजी न्यायमूर्ती विनय जोशी, न्यायमूर्ती मेहरज पठाण, सचिव बसवराज हिंगमिरे, रजाक शेख, मिलिंद थोबडे, जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा, एम. के. प्रसाद आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक ॲड. बाबासाहेब जाधव यांनी केले. यावेळी महाराष्ट्र–गोवा बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ॲड. मिलिंद थोबडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

परिषदेत विविध कायदेविषयक विषयांवर न्यायमूर्ती आणि वरिष्ठ विधिज्ञांनी मार्गदर्शन केले. या परिषदेला उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालयातील न्यायाधीश, वरिष्ठ विधिज्ञ, महाराष्ट्रातील विविध बार असोसिएशनचे पदाधिकारी, वकील, विधी महाविद्यालयांचे प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**खंडपीठाच्या उल्लेखावर सभागृहात हशा**

भूषण गवई यांनी भाषणादरम्यान कोल्हापूर येथे खंडपीठ स्थापन करण्याच्या मागणीचा उल्लेख केला. *"सोलापूरला हे खंडपीठ व्हावे याला माझा विरोध होता,"* असे मिश्कीलपणे म्हणताच सभागृहात एकच हशा पिकला. त्यानंतर त्यांनी स्पष्ट केले की, कोल्हापूर येथे खंडपीठ सुरू झाल्याने नागरिकांची मोठी सोय झाली असून भविष्यात ते पूर्णवेळ खंडपीठ व्हावे, यासाठी प्रयत्न सुरू राहतील.

कार्यक्रमात माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. जिल्ह्यातील अकरा तालुका बार असोसिएशननेही त्यांचा सत्कार केला. विशेष म्हणजे, पंढरपूर बार असोसिएशनने विठ्ठलाचा पोशाख, गळ्यात तुळशीहार आणि वीणा अर्पण करून केलेल्या अनोख्या सत्कारामुळे गवई भावूक आणि भारावून गेले.

# एन. बी. नवले सिंहगडचे विद्यार्थी देशातील नामांकित कंपन्यांत झळकले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव–सोलापूरने यंदाच्या प्लेसमेंट हंगामात उल्लेखनीय यश संपादन करत उद्योगविश्वात आपल्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रभावी छाप पाडली आहे. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची निवड केली असून २०२४–२५ आणि २०२५–२६ या दोन शैक्षणिक वर्षात एकूण २३३ विद्यार्थ्यांना प्लेसमेंट, तर २४८ विद्यार्थ्यांना इंटर्नशिपच्या संधी मिळाल्या आहेत.

यंदाच्या प्लेसमेंटमध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील कीर्तन करवा याने दुबईस्थित कन्सिस्टंट इंजिनिअरिंग कन्सल्टंट्स एलएलसी (अभियांत्रिकी सल्लागार कंपनी) या आंतरराष्ट्रीय कंपनीत ऑटोमेशन इंजिनिअर पदासाठी वार्षिक १८.५५ लाख रुपयांच्या आकर्षक पॅकेजसह ऑफर मिळवत महाविद्यालयातील सर्वोच्च प्लेसमेंटचा मान पटकावला आहे.

तसेच विशाल मोटे याची ठक्कएए या जागतिक तंत्रज्ञान कंपनीमध्ये ७.५ लाख रुपयांच्या वार्षिक पॅकेजवर निवड झाली असून, ओंकार सुरवसे याने रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडमध्ये ६ लाख रुपयांच्या पॅकेजसह यश संपादन केले आहे. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील संजना टाळकोकुळ हिची रॉकवेल ऑटोमेशन मध्ये ६.५ लाख रुपयांच्या पॅकेजवर निवड झाली असून, विविध विभागांतील अनेक विद्यार्थ्यांनी पियाजिओ व्हेईकल्स, व्हील्स इंडिया, डॅनफॉस पॉवर सोल्यूशन्स आणि इन्फोटेक सोल्यूशन्स यांसारख्या नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची निवड झाली. सिंहगड महाविद्यालयाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे.

महाविद्यालयाच्या प्लेसमेंट आकडेवारीनुसार यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील ६५, ई&टीसी विभागातील ७४, इलेक्ट्रिकल विभागातील ४४, कॉम्प्युटर सायन्स विभागातील ४१ आणि सिव्हिल विभागातील ९ विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत. याशिवाय विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळावा यासाठी २४८ विद्यार्थ्यांना इंटर्नशिप उपलब्ध करून देण्यात आली.

महाविद्यालयातील अत्याधुनिक प्रयोगशाळा, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम, व्यक्तिमत्त्व विकास, तांत्रिक कौशल्यवृद्धी, मॉक इंटरव्ह्यू, अप्टिट्यूड प्रशिक्षण आणि प्लेसमेंट सेलचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये करिअरच्या उत्कृष्ट संधी उपलब्ध होत असल्याचे महाविद्यालयाने सांगितले.

महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सहसचिव तथा कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, डॉ शंकर नवले, उपप्राचार्य डॉ रवींद्र व्यवहारे, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. विकास मराठे, प्रा. शशिकांत हिप्परगी, विभागप्रमुख, प्राध्यापक आणि प्लेसमेंट विभागाने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अकलूज उपविभागीय अधिकारी यांना वाहतुकीच्या समस्या बाबत निवेदन



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** राष्ट्रवादी युवक काँग्रेस सोलापूर जिल्ह्याचे कार्यकारी अध्यक्ष अक्षय नितीन भांड यांनी नातेपुते येथील ग्रामस्थांना व व्यापाऱ्यांना वाहतुकीच्या येणाऱ्या समस्येबाबत व येथील वाहतूक नियंत्रण ठेवण्यासाठी तात्काळ अंमलबजावणी व्हावी यासाठी अकलूज उपविभागीय अधिकारी संतोष वाळके यांना निवेदन देण्यात आले आहे. देण्यात आलेल्या निवेदनामध्ये म्हणण्यात आले आहे की, नातेपुते शहरातील महिला भगिनी दैनंदिन कामासाठी बाहेर पडताना होणारी धावपळ आणि त्यांच्या सुरक्षितेचा प्रश्न, शालेय विद्यार्थ्यांना शाळा आणि महाविद्यालयाच्या वेळी होणाऱ्या गर्दीमुळे विद्यार्थ्यांचा वाहतुकीच्या समस्येमुळे वाया जाणारा मौल्यवान वेळ, व्यापारी व नागरिकांना अरुंद रस्ते आणि वाहनांच्या गर्दीमुळे व्यापारावर विपरीत होणारा परिणाम व त्यामुळे ग्राहकांना बाजारात येणे कठीण तसेच रुग्णवाहिका व आपत्कालीन सेवा यासाठी मुख्य रस्त्यावरील कोंडीमुळे रुग्णवाहिका आणि आपत्कालीन सेवा देणाऱ्या वाहनांना रस्ता मिळत नाही त्यामुळे रुग्णांच्या ते जीवावर बेतू शकते. त्यासाठी नातेपुते शहरातील मुख्य चौकात वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस कर्मचाऱ्यांची कायमस्वरूपी नेमणूक करणे, अवजड वाहनांच्या प्रवेशासाठी वेळेचे बंधन आणि नो–पार्किंग झोनची कडक अंमलबजावणी करणे, वाढत्या लोकसंख्येचा विचार करून शहरासाठी प्रभावी 'ट्रॅफिक मॅनेजमेंट प्लॅन' तयार करणे अशा विविध मागण्या राष्ट्रवादी युवक काँग्रेस सोलापूर जिल्ह्याचे कार्यकारी अध्यक्ष अक्षय नितीन भांड यांनी अकलूज उपविभागीय अधिकारी संतोष वाळके यांना लेखी निवेदनाद्वारे केल्या आहेत. यावेळी अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी सदर देण्यात आलेल्या निवेदनाबाबत सकारात्मक विचार करून त्याची लवकरच अंमलबजावणी करू असे सांगितले.

# मराठा सेवा संघातर्फे व्ही.व्ही.पी. इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** मराठा सेवा संघाच्या वतीने व्ही.व्ही.पी. इंजिनिअरिंग कॉलेज येथे दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सूर्यकांत पाटील ( शहराध्यक्ष म .से.संघ) यांनी प्रास्ताविक करताना मराठा सेवा संघातर्फे दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव केला जात असल्याचे सांगितले. दहावी–बारावी हा विद्यार्थ्यांच्या यशाचा पहिला टप्पा असून चारित्र्य संवर्धन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डी.एम कमळे कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटचे संचालक अभिजीत जवळकोटे यांनी दहावी–बारावी हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगून कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्य यांच्या जोरावर यश निश्चित मिळते, असा विश्वास व्यक्त केला.

व्ही.व्ही.पी. पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. एस. एन. कुलकर्णी यांनी चांगले संस्कार व सकारात्मक विचार यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, असे सांगत तंत्रशिक्षणाचे वाढते महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. व्ही.व्ही.पी. इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. ए. एन. गायकवाड यांनी शिक्षण क्षेत्रातील बदल, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होत असलेल्या शैक्षणिक संधी आणि तंत्रशिक्षणामुळे रोजगाराच्या वाढत्या संधी याबाबत मार्गदर्शन केले. शिवमती उज्वला साळुंखे (जिल्हाध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड सोलापूर)यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाची कास धरून मोठी स्वप्ने पाहा, प्रगती करा आणि समाजासाठी प्रेरणादायी कार्य करा, असा संदेश दिला.

मराठा सेवा संघाचे अध्यक्ष व व्हि. व्हि पी संस्थापक चेअरमन डॉ. जी. के. देशमुख यांनी संघाच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांनी स्वतःची क्षमता आणि आवड ओळखून योग्य करिअरची निवड करावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष माने यांनी केले, तर आभार विकास भांगे यांनी मानले. या प्रसंगी व्हि.व्हि.पी. संस्थेचे अध्यक्ष श्री. अमोल (नाना) चव्हाण , व्हाइस चेअरमन मधुकर कटकधोंड प्रा. लक्ष्मण महाडिक, जीवन यादव, प्रकाश ननवरे, आर. पी. पाटील, हनुमंत पवार, परशुराम पवार, सचिन चव्हाण, अंबादास सपकाळे, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा लोकशाही दिनात 42 तक्रार अर्ज प्राप्त

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी दि. 6 जुलै 2026 रोजी झालेल्या जिल्हा लोकशाही दिनात विविध विभागांशी संबंधित एकूण 42 तक्रार अर्ज व निवेदने प्राप्त झाली. उपजिल्हाधिकारी महसूल लक्ष्मण कसेकर यांनी स्वतः नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या व सर्व संबंधित विभागप्रमुखांना प्राप्त तक्रारींचा विहित मुदतीत निपटारा करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

**विभागनिहाय प्राप्त अर्जांची संख्या**

लोकशाही दिनात जिल्हा परिषद सोलापूर – 9, भूमी अभिलेख – 3, पोलीस आयुक्त सोलापूर शहर – 5 अपर चिटणीस – 1, तहसील पंढरपूर –1, महावितरण – 2, पोलीस ग्रामीण – 2, जिल्हा उद्योग केंद्र – 1, जिल्हा अग्रणी बँक – 2, कार्यकारी अभियंता उजनी प्रकल्प – 1, तहसील दक्षिण सोलापूर – 1, जिल्हा पुरवठा कार्यालय – 1, तहसील माळशिरस – 1, जिल्हा उपनिबंधक – 1, जिल्हा पुनर्वसन कार्यालय – 1, भूसंपादन समन्वय – 2, आस्थापना शाखा – 3, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग – 1 व इतर विभाग – 4 असे एकूण 42 अर्ज प्राप्त झाले.

यावेळी उपजिल्हाधिकारी कसेकर म्हणाले, ह्लोकशाही दिनाच्या माध्यमातून नागरिकांना प्रशासनासमोर थेट आपल्या समस्या मांडण्याची संधी मिळते. प्रत्येक तक्रारीची गंभीर दखल घेऊन संबंधित विभागाने विहित कालमयार्देत कार्यवाही करावी व अर्जदाराला केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी.ह्व

बैठकीस तहसीलदार श्रीमती दंडीले यांच्यासह जिल्हा परिषद, पोलीस, महावितरण, महसूल, भूमी अभिलेख, जिल्हा उद्योग केंद्र, अग्रणी बँक, पुरवठा, पुनर्वसन, भूसंपादन, सार्वजनिक बांधकाम आदी विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# उजनी धरण पट्ट्यातील शेतकऱ्यांसाठी गणेश चिवटे मैदानात

## आठ तास वीजपुरवठ्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** करमाळा तालुक्यातील उजनी धरण पट्ट्यातील गावांमध्ये शेतीपंपांसाठी केवळ दोन तास वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. ऊस, डाळिंब, केळी, चारा तसेच इतर नगदी पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने ही पिके करपण्याच्या मार्गावर असून हजारो शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य गणेश चिवटे यांनी आज सोमवारी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन उजनी धरण पट्ट्यातील गावांना किमान आठ तास नियमित व अखंडित वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी केली.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात महावितरणकडून होत असलेल्या अपुऱ्या आणि अनियमित वीजपुरवठ्यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. उजनी धरण पट्ट्यातील अनेक गावांमध्ये शेतीपंपांना फक्त दोन तास वीज मिळत असल्याने शेतकऱ्यांना पिकांना आवश्यक तेवढे पाणी देता येत नाही. परिणामी ऊस, डाळिंब, केळी, जनावरांसाठीचा चारा तसेच इतर नगदी पिकांचे उत्पादन धोक्यात आले आहे. पिकांचे नुकसान होण्याबरोबरच पशुधनासाठी चाऱ्याचा गंभीर प्रश्नही निर्माण होऊ लागला आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शेतीपंपांसाठी किमान आठ तास अखंडित व नियमित वीजपुरवठा सुरू करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली.

यावेळी गणेश चिवटे यांनी उजनी धरण पट्ट्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाची तीव्रता अधोरेखित करताना सांगितले की, ह्लउजनी धरण पट्ट्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न हा केवळ वीजपुरवठ्याचा प्रश्न नसून त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. पिकांना वेळेवर पाणी मिळाले नाही तर शेतकऱ्यांच्या हातातले सर्व काही जाईल. त्यामुळे या भागातील प्रत्येक शेतकऱ्याला न्याय मिळावा, यासाठी आम्ही शासन स्तरावर पाठपुरावा करत आहोत.ह्व

या प्रश्नाच्या अनुषंगाने राज्य शासन पातळीवरही हालचाली सुरू झाल्या असून उद्या मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे, अशी माहितीही गणेश चिवटे यांनी दिली. या बैठकीत उजनी धरण पट्ट्यातील वीजप्रश्न, शेतकऱ्यांची सद्यस्थिती आणि शेतीपंपांसाठी आवश्यक वीजपुरवठा यावर सविस्तर चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

उजनी धरण पट्ट्यातील गावांमध्ये सध्या शेतीपंपांसाठी अपुरा वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तसेच बागायती पिकांसाठी नियमित पाणीपुरवठा अत्यावश्यक असताना केवळ दोन तास वीज मिळत असल्याने शेती व्यवस्थापन कोलमडत चालले आहे. त्यामुळे शासनाने आणि महावितरणने तातडीने हस्तक्षेप करून या भागाला आठ तास वीजपुरवठा देण्याचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

# अनुसूचित जाती-जमाती शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सन 2026–27 मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजना प्रति थेंब अधिक पिक (सुक्ष्म सिंचन) योजनेसाठी मा. आयुक्त (कृषि) यांचे आदेशानुसार महाराष्ट्र शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रति थेंब अधिक पिक या योजनेअंतर्गत अनुसुचित जाती–जमाती प्रवगार्तील शेतक–यांकरीता निधी उपलब्ध असल्याने ठिबक सिंचन, तुषार सिंचन बाबीकरीता अर्ज मागविण्यासाठी दि.01 जुलै 2026 ते 31 जुलै 2026 कालावधीत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. तरी अनुसुचित जाती–जमाती प्रवगार्तील जास्तीत जास्त शेतक–यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत.

**या संकेतस्थळावर नोंदणी करावी**

शेतकऱ्यांनी अर्ज भरण्यासाठी https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin या संकेतस्थळावर नोंदणी करावी. शेतकऱ्यांनी अर्ज सादर करताना माहिती अचूक भरावी अन्यथा अर्ज रद्द होण्याची शक्यता असते. अर्ज करताना ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी, आधार कार्ड, बैंक पासबुक व जातीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. योजनेचा लाभ 5 हेक्टर पर्यंत देण्यात येणार आहे. पोर्टलवर "प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्तवार स्वीकारले जातील. अजार्ची महाडीबीटी पोर्टलवर संगणकीय सोडत काढण्यात येईल व निवड झाल्यानंतर शेतकऱ्यांना लघु संदेशादवारे कळविण्यात येईल.